© INTERNATIONAL JOURNAL FOR RESEARCH PUBLICATION & SEMINAR
ISSN: 2278-6848 | Volume: 10 Issue: 01 | January - March 2019
Paper is available at www.jrps.in | Email : info@jrps.in

# तहान : एक आकलन

सौ. स्मिता गोवर्धन शहाण, एल.ए.डी. महाविद्यालय शंकरनगर, नागपूर

❖ सारांश : –

तहान ही कादंबरी अतिशय गाजली ग्रामीण जीवनातील भयाकुल करणारे वास्तव, पाणीटंचाईने ग्रासलेले गाव, त्याचाही फायदा घेणारे ठगे लोक, कमकुवत शासकीय यंत्रणा, स्वार्थी गावपुढारी, या कादंबरीमध्ये दोन पिढ्यातील संघर्ष दाखविला आहे. ओंजळभर पाण्यासाठी वणवण हिंडणाऱ्या आणि रात्रभर जागणाऱ्या बायका आणि पैशासाठी पिळवणूक करणारी स्वार्थी माणसे यांचे ग्रामीण जीवनातील चित्रण या कादंबरीत आलेले आहे.

पाणीटंचाईमुळे विस्कटलेल्या खेड्याच्या आणि कुटुंबाच्या पार्श्वभूमीवर नव्या–जुन्याचा संघर्ष व त्या संघर्षात 'त्रिशंकू' झालेल्या बबन शेवाळेची शोकांतिका हा तहान चा विषय आहे.सदानंद देशमुख यांनी तहान कादंबरी मध्ये ग्रामीण जोवनाचे चित्रण रेखाटताना जिवंत खेड्याचे दर्शन दाखवून दिले आहे.

ISSN : 2278-6848
© International Journal for Research Publication and Seminar

❖ प्रस्तावना :–

डॉ. सदानंद नामदेव देशमुख हे मराठी भाषेत लिहिणारे भारतीय कवी, कादंबरीकार च कथाकार आहेत. त्यांचा जन्म आमडापूर या खेड्यात एका शेतकरी कुटुंबात झाला. सदानंद देशमुख यांची पहिली कादंबरी तहान 1998 साली प्रकाशित झाली.

लेखक ज्या समाजात जन्मतो त्या समाजाचे संस्कार त्याच्यावर घडत असल्यामुळे समाजातील वास्तव तो आपल्या लेखनातून मांडत असतो. साहित्य आणि समाज एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे. समाज हा साहित्य निर्मितीचा मुळ स्त्रोत असून साहित्य व समाजाला लेखक आपल्या साहित्यातून समाजातील त्या त्या काळातील संकल्पना, संस्कृती, परंपरा, पर्यावरण इत्यादी घटकांचे चित्रण अतिशय संवदनशीलतेने करतो म्हणून समाज हा लेखकाच्या साहित्यकृती निर्मितीतील एक महत्वाचा घटक ठरतो. लेखक आपल्या साहित्यातून सामाजिक जीवन, वेगवेगळ्या समस्या, काळानुरूप बदलणाऱ्या रूढी–परंपरा, शोषण, बेकारी, गरिबी, शेतकरी जीवन आणि सामाजिक जीवन त्या त्या काळातील वास्तवपूर्ण जीवनाला आणि लेखकाच्या अनुभवसंपन्नतेला केंद्रित करते.

कृषी जीवनाची समग्रता, सर्वकषता व सूक्ष्मता हे या कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्या आहे. ग्रामीण परिसर तेथील कृषिनिगडीत जनजीवन, झाडे, पशु, पक्षी, कीटक आणि या सर्वांवर होत असलेले आधुनिकीकरणाचे जागतिकीकरणाचे परिणाम, त्यामुळे निर्माण झालले विपरीत समाजवास्तव तहान कादंबरीतून दिसून येते.

ग्रामीण जीवनातील जीवन–जाणिवांच्या उभ्या–आडव्या ताण्या–बाण्यांनी कादंबरीचे 'पोत' लक्षणीय बनले आहे. नव्या जुन्या पिढीचा संघर्ष कौटुंबिक पातळीवरील नात्यां मधला संघर्ष, शहर विरूध्द खेडे, किंवा श्रीमंत विरूध्द गरीब अशा अनेकविध प्रकारच्या बाह्या संघर्षासोबतच व्यक्तींच्या आंतरीक संघर्षाच्या पीळदार विणीतून कादंबरीचे 'पोत' सतेज झाले आहे.

'तहान मध्ये तहानलेपणाचं विराट दर्शन आहे. या तहानेचा आवाका जल–तृष्णपुरताच मर्यादित नसून तृष्णा किंवा तहान ही अनेक प्रकारची असू शकते.

सत्तची, भोगाची, आसक्तीची तहान माणसाला व माणसांच्या समूहाला असू शकते. आणि त्याच्या अनेक पद्धती ही आहेत. पण पाण्याच्या तहानेनं आक्रंदणाऱ्या एका

गावाचं चित्रण करत लेखक सदानंद देशमुख आपण टाळत असलेल्या किंवा दुर्लक्ष करत असलेल्या वास्तवाकडे खेचून नेतो.

1975 नंतर ग्रामीण कादंबरीकाराची नवशिक्षितांची नवी पिढी उदयााला आली आणि ग्रामीण कादंबरीचे दालन अधिक समृद्ध झाले, दलित, आदिवासी, बहुजन अश्या विविध स्तरातून आलेले कादंबरीकार ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म, वास्तव, कठोर पद्धतीने साकार करतांना दिसतात.

## ❖ तहान कादंबरीतील ग्रामीण जीवन :—

''कागदी पुस्तकात काव्यात । खेडयाचे वर्णन दिव्य बहुत।
परि वस्तुस्थिती पाहतां तेथ। क्षणभरही राहवेना ।।''

— राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

अशी खेड्याविषयीची नापसंती रा. तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेत व्यक्त केलेली आहे.

ग्रामीण साहित्याच्या या व्यापक 'भाना' चा प्रत्यय 'ग्राम', 'ग्रामीण साहित्य' इ. संकल्पनांची जी स्पष्टीकरणे या चळवळी कडून करण्यात आली आहेत. त्यातूनही येतो.

'ग्रामीण' या शब्दाचा या प्रवाहाला केवळ ग्रामातोल, खेड्यातील व 'ग्रामीण साहित्य', म्हणजे केवळ ग्रामीण माणसा संबंधीचे, खेड्यासंबंधीचे साहित्य' असा संकुचित अर्थ अभिप्रेत नाही. डॉ. आनंद यादव त्या संदर्भात म्हणतात, ''ग्रामीण हा शब्दप्रयोग फक्त ग्रामातील व्यवस्थेशी निगडीत नाही........ त्याचा अर्थ 'शहरी व्यवस्थे व्यतिरिक्त जी भारतीय जीवन व्यवस्था आहे त्या सर्व व्यवस्थेला व्यापणारा असा अर्थ या चळवळीला अभिप्रेत आहे.''[1]

सुखी जीवनाची तहान बाराही महिने सोसाव्या लागणाऱ्या वेदना हेच ग्रामीणांचे जीवन झाले आहे. हाच धागा पकडून अतिशय स्पष्टपणे या वेदनांना सदानंद देशमुख यांनी मांडले. प्रा. येळवंडे यांनी सदानंद देशमुखांच्या लेखनामागे सामाजिक वास्तवाची प्रेरणा असून ग्रामीण भागातील समाजाची स्थिती सांगितली आहे.[2]

सदानंद देशमुख यांची 'तहान' ही कादंबरी समाजाच्या मूलभूत समस्येवर म्हणजे पाणीटंचाईवर आधारीत आहे. त्यामुळे या कादंबरीतील ग्रामीण समाजातील लोकांचे चित्रण यात आढळते. पाणी टंचाईच्या भीषण समस्येने ग्रासलेला समाज नैसर्गिक जीवनापासून तुटत चालला होता. त्यामुळे माणसामाणसांतील मूल्यसंघर्ष या कादंबरीतून व्यक्त केले आहे.

पाणीटंचाईचा प्रश्न उग्र स्वरूप धारण करताच समाजातील राजकारणाशी स्वतःच्या स्वार्थासाठी याचा वापर करून सामान्य माणसांच्या भावनांचा विचार करीत नाही. समाजातील प्रश्नाकडे दुर्लक्ष करणाऱ्या आजच्या वास्तवाची जाणीव घागर मोर्चाच्या प्रसंगवर्णनातून लेखकाने व्यक्त केलेली आहे. राजकारण, अर्थकारण, मुल्यसंघर्ष, यातुन बदलत्या सामाजिक परिस्थितीची जाणीव या कादंबरीतून होते.

पाणीटंचाईमुळे समाजाला भविष्यात कोणत्या संकटांना सामोरे जावे लागणार आहे हे वास्तव या चर्चेतून लेखकाने वाचकांसमोर मांडले आहे. 'तहान' या कादंबरीत सदानंद देशमुख यांनी समाजातील वास्तवता अधिक तीव्रतेने चित्रित केली आहे. गावात तंत्रविज्ञान पोहचले, शिक्षण आले. तरीदेखील माणसाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी ग्रामीण समाज आजही संघर्ष करताना दिसतो.

शेतकऱ्यांच्या शोषणाच्या अनेकव्यथा सदानंद देशमुख यांनी लिहिल्या असुन समाजातील शोषित घटकाकडून शेतकऱ्याचे होणारे शोषण बदललेल्या सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडवितात. खेड्यामध्ये राजकारण आल्यामुळे स्वार्थी, धूर्त राज्यकर्त्यांमुळे ग्रामीण

विकास आज खुंटीत झालेला दिसतो. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या समस्या तश्याच असून शेतीविषयी सरकारची अनास्था ग्रामविकासाचा अडथळा बनली आहे.

### ❖ सारंगपूर गावाचे दर्शन :–

सारंगपूर नावांच पुणे–नागपूर महामार्गावरचं एक गाव. अगदी नावापूरतं सदानंद देशमुख यांनी आपल्या गावाचं कादंबरीसाठी नामांतर केलंय बाकी सगळे पाहता खाणाखुणा हे त्यांच अमडापूर नावांच गावच यात आहे(3). सदानंद देशमुख यांचे तिथले घर आणि या गावातील अनेक माणसं आपल्याला या कादंबरीत दिसतात. त्यात सगळ्यात महत्त्वाच्या जागी आहे राघोजी शेवाळे आणि त्यांच कुटूंब. त्यांचा मुलगा बबन, त्याची बायको रामकोर, मुलगी वर्षा आणि मुरल्या–छबिल्या नावाची बैलजोडो आणखी बरीच पात्रं आहेत

सारंगपूर या विदर्भातील एका खेड्याच्या रूपाने एका सडलेल्या मूल्यहीन समाजाचं चित्र 'तहान' मध्ये येते. मराठी ग्रामीण कादंबरीला एका वेगळ्या वास्तव वाटेने नेणारी कादंबरी म्हणून 'तहान' चा उल्लेख केला पाहिजे. त्या गावात राहणारी अठरा पगड जातीतली माणसं, पशू, पक्षी, निसर्ग यांना वरपासून खालीपर्यन्त लुबाडणारी शासन यंत्रणा व समाजयंत्रणा देशमुखांनी आपल्या 'तहान' कादंबरी मध्ये चित्रित केली आहे.

'तहान कादंबरीमध्ये सारंगपूर गावातील नुसता उन्हाळा आणि त्याच्या होरपळीचे चित्रण बघायचं ठरलं तरी 'तहान' ची सुरवात त्यासाठी कमी पडते. शिवारात उन्हाची धग उठली होती. सार रानं होरपळून निघत होतं, गुराखी पोरांनी डोंगर उतारावर किंवा नाल्या ओहळाच्या काठावर गुरं चारायला आणली होती. ती वाळल्या जमीनीवर दाताडं घासून थकली होती आणि चुकार झाडाची सावली पाहून विसावली होती पोटं आत गेलेली आणि हाडं हाडं झालेली रवंथ करत होती. दाताडं हलताना त्यांचा मिटल्या थकल्या डोळ्यातून चिकट पाणी गळत होते. तोंडातून फेस येत होता आणि अंगावरच्या गोमाश्या शेपडीन उडवून लावाव्या अस वाटत होतं. पण शेपटीत त्यांच्या तेवढ बळ उरल नव्हत त्याच्यानं तशाच चावू देत होते. (पृष्ठ क.1)

### ❖ 'तहान कादंबरीतील वैशिष्टपूर्ण व्यक्तिरेखा–

➢ राघोजी शेवाळे

"प्रेमाने धरूनी करात आपुल्या शेतामधी नांगर।
लीलेने जणू गाईली तुवा बहु काव्ये सदा सुंदर।"
– काशिनाथ हरी मोडक

यांनी व्यक्त केलेली ही भावना राघोजी शेवाळेच्या प्रेरणा स्त्रोताची साक्ष देतात.

या कादंबरीतला प्रमुख कथानकातला प्रमुख अक्ष म्हणजेच राघोजी शेवाळेचे कुंटुबच आहे. राघोजी हा शेतकरी आपल्या बैलावर मुलांप्रमाणे नितांत प्रेम करणारा जुन्या पिढीतील कास्तकार आहे. 'झाड म्हणजे जमिनीची शोभा, पोरं म्हणजे घराची शोभा अन् ढोरं म्हणजे गाठ्याची शोभा अश्या शब्दात त्याचे मूल्य व्यक्त होते. त्या मुळंच सारीकडं हाडकलेली गुरं–ढोरं दिसत असताना त्याचे मुरल्या–छबिल्या हे बैल हत्तीसारखे. अंगावर लदलद मांस असलेले.

मासल्या दाखल दोन जागा बघू. बबन बैलाना वापरून आतोनात पाणी विकत असतो. राघोजी बैलासाठो अस्वस्थ असतो. 'तर एकदम आठवण झाली त्यानं गोठ्यात बैल नव्हतेच....... गेला वाटते वाटते पुन्हा बबन्या गाडी घेवून. करते लेकाच आता मपल्या बैलायचा चकनाचुर....... मायमी याच्या बैलं म्हन्जे माह्या काळजाचे तुकडे. त्याहले खाऊ–पिऊ घालून म्या सठ सुदरवलं अन् हा सुपूत सान्या सारख्या माह्या बैलायची माती करायला लागला..... (पृ.21) राघोजी आपल्या खंगत चाललेल्या बैलामुळे सतत अस्वस्थ असतो. घरात येणारा पैसा, पंखा, टि.व्ही. यांच्याशी त्याला मतलब नसतो. घरात शिजणाऱ्या मटनाशी त्याला घेणं देणं

नसत लोकांच्या पाण्याची काही ना काही सोय होईल, आपल्या मुलाचा पाण्याचा धंदा बसेल अपल्या बैलांना आराम मिळेल म्हणून तो गावकऱ्यांनी काढलेल्या मोर्च्यात सामील होतो. तिथल्या दंग्यात धावपळीत पडतो. आणि कायमचा लंगड होवून बसतो. (पृष्ठ क.123)

बैलाना अतिश्रम होत असतात आणि हडकू लागतात. त्यामुळे राघोजीच्या जिव तिळतिळ तुटत असतो. शेतीच्या कामाकडे दुर्लक्ष करत बबन पैसा अधिक कमावतो. पण बैल मात्र अधिक खचत जात असतात. लंगडा राघोजी सुद्धा बसल्या जागी आतल्या आत खचून जातो. बैलाची रया जाते. ''कावळे त्या बैलांना टोकत कुरतडत असतानाही शेपटीत त्यांच्या तेवढं अवसानच उरलं नव्हतं. त्याच्यान तशाच चावू देत होते''. (पृष्ठ क.1)

➢ बबन शेवाळे :–(राघोजी शेवाळेचा मुलगा)

या कादंबरीतील नायक बबन शेवाळे. राघोजीचा मुलगा बबन त्याचे हत्तीसारखे बैल घेवून एकदा देवराव बापूचा मळयावरचा तो चढ चढतो. अन् ते भरलेली गाडी त्या अवघड चढावरून सहज ओढून नेतो. पाण्याचे दोन मोठाले ड्रम भरलेले असतानासुध्दा. तिथुन पाणी विक्रीतून मिळवलेला पैसा शारीरिक सुख मिळवण्यासाठी रत्नाावर उधळतो. पाणी विक्रीतून मिळवलेल्या पैशातून भौतिक सुखाची लालसा करणारा बबन नैतिकता विसरतो व रत्नाचा उपभाग घेतो. कमी कष्टात अधिक पैसा मिळवण्यच्या धुंदित बबन आपल्या वडीलांचा राघोजीच्या वारंवार अपमान करतो. त्यांनी जिवापाड जपलेल्या बैलाकडे दुर्लक्ष करतो. शेती व्यवसायाकडेही दुर्लक्ष करतो.

शेतीविषयी बबनला जास्त ओढ नसल्यामुळे राघोजीच बैलाविषयी प्रेम जास्त अतिरेकी वाटते. बैलांच्या हाल–अपेष्टा पाहून वैतागलेल्या राघोजी त्याची पत्नी रामकोरशी भांडतो. तिला मारायला धावतो. तिच्या पाठीत कुऱ्हाडीचा दांडा घालतो. त्यावर बबन म्हणतो,'. ..... नासुकल्या बैलासाठी तुमी मायले मारलं? बैलं काय, हे मेले त घेता येतीन दुसरे.... पण मपली माय मेली त बेटीन का मले? माणसापेक्षा तुमाले बैलं जास्ती वाटतात का? (तहान पृ. 41) पण म्हणून बबनचा बैलावर जीव नाहीय, असं नाही. तोही बैलाची काळजी घेतो त्याच्या जखमांना कळवळतो.

या गरिबीत खस्ता खाण्यापेक्षा नवा पाणी विकण्याचा धंदा करावा व खुप पैसे मिळवावे आणि चैनीचे जीवन जगावे. बबन इथे बदलल्या सारख्या वाटतो; पण तो बदल वरवरचा आहे. राघोजीचे पशु प्रेमाचे मूल्य बाजूला सारून तो बैलांना पाण्याच्या टाकीला जुंपतो व बैलांची हेळसांड करतो. कमाईच्या व तारूण्याच्या धुंदीत बबनला रत्ना नावाची गरीब घरातील दखणी मुलगी भेटते. तिच्यावर तो पैसे उधळू लागतो त्या तारूण्याचा धुदीत रत्नाशी शरीरसंबंध ठेवतो. आणि तिच्यावर केलेली कमाई पण उधळतो. नंतर गावात सरकारी टॅकरनं पाणी पुरवठा सुरू होतो आणि बबनचा धंदा बसतो, त्याची आणि रत्नाची भानगड; ते सारं रत्नाचा बाप रंगेहाथ पकडतो. तो बबनला आणि रत्नाला आतोनात बुकलतो. हा सारा खेळ पत्रकार नवले, पालिस सोमनाथ, मोहन काळे यांनी घडवून आनलेला असतो.

केस होवू नये म्हणून बबनकडे दहा हजार रूपये रत्नाच्या बापाला देण्यासाठी व प्रत्येकी एक हजार पत्रकार व पोलिस यांच्यासाठी मागितले जातात. त्यावेळी त्याचो आई रामकोर त्याला एकही पैसा देत नाही आणि वैतागून एका क्षणी तो नाहीसा होतो.

चंगळवादी वृत्तीचे दर्शन घडविणारी बबनची व्यक्तीरेखा बदलत्या सामाजिक परिवर्तनाचे प्रतिनिधित्व करते. त्यातून सामाजिक नैतिक मूल्याची होणारी घसरण सदानंद देशमुख चित्रित करतात. आजच्या तरूण पिढीची शेती व्यवसायाविषयीची अनास्था बबनचा वर्तमानातून लेखकाने चित्रित केली आहे.

➢ रामकोर :–(राघोजी शेवाळेची पत्नी)

या कादंबरीतील रामकोरची व्यक्तीरेखा सुध्दा मनात रेंगाळत राहणारी आहे. तिच्या नावापासून तिचे वेगळेपण सुरू होतं. रामकोर ही शेतीतल्या श्रमांनी आणि सततच्या अभावानं वैतागलेली आहे. म्हणूनच बबन पाण्याचा पैसा मिळवायला लागल्यावर ती खूश होते. त्याच्या घरात पंखा, अश्या गोष्टी येतात. पाहिजे तेव्हा मटणं शिजतं बबनची आई म्हणजेच रामकोर खूष होते. ती त्याला बबनराव म्हणू लागते. घरात आता त्याचीच 'ठसण' चालणार असं ठणकावून राघोजीला; तिच्या नवऱ्याला सांगते घडोघडी नवऱ्याचा पाणउतारा करते. मांस मटण अधाशीपणे खाते. पंखाचा वारा घेते. टी.व्हो. सिरियल बघते. सोन्याच्या दागिन्यांची स्वप्नं पाहते. आणि हे सगळ ऐश आरामाची जिंदगी देणारा मुलगा सार काही मागतो व आईची म्हणजेच रामकोर सोन्याची पोत तो रात्री अकरा वाजता घरात सगळे झोपले असताना चोरायला मागे पुढे पाहत नाही. आणि रामकोर ठसठसणाऱ्या डोक्याला काबूत ठेवण्यासाठी घट्ट फडकं बांधते. सुखाचा एका बारक्या क्षणासाठी तिच्याच उगवलेला तान भुईसपाट होतो

राघोजी घरी येतो. रामकोर दारातच फलकत मारून बसलली असते. दातांच्या खिंडीत अडकून पडलेले मासांचे धागे ती दातकोरण्यात उपसून फेकत असते. तिला तसं पाहून राघोजीच्या मनात येतं,'...... आता चांगलीच काटा मारल्यावानी दिसती. वावरा शिवारात जायचं काम नाई. पोराची कमाई सुरू हाय. चोपड चोपड खायले भेटते, त चांगली मासाळून राहयली. गावरान जवारीले रासायनिक खत देल्यावाणी....... (तहान प 21)

रामकोरच्य लेकीन म्हणजेच वर्षाने दिलेल पाणी पिताना रामकोर म्हणाली की, 'काय वंगाळ लागते व हे पाणी........ सम्दा शेवाळाचा का कशाचा गचाळ वास मारून राह्यालं (तहान पृ 175).'' त्यावेळी रामकोर ची मुलगी म्हणजेच वर्षा म्हणते की सम्दा गाव असच पाणी पितात आपण लय चवणेखोर झालो नं म्हणुन आपल्याला पाण्याची अशी धमकतर येणारच हाये.

आयुष्यभर काबाडकष्ट करणारी रामकोर मुलांकडून पैसे मिळताच आपल्या नवऱ्याचा त्रागा करते. राघोजीच्या घागर मोर्चेत पाय मोडल्यावर '' पाय मोडल्यावर नसतात भेटत का पैसे (तहान पृ.123) असा प्रश्न विचारते. व आपल्या स्वार्थी वृत्तीचे दर्शन घडवित. पतीचा आदर करणारी आपली भारतीय संस्कृतीत राघोजीचा पाणउतारा करण्याची एकही संधी रामकोर सोडत नाही. बदलत्या सामाजिक परिवर्तनात कुटुंबातील पमाची नातीदेखील स्वाथी कशी बनतात हे रामकोरच्या व्यक्तिचित्रणातून सदानंद देशमुख यांनी मांडले आहे.

➢ वर्षा :–(राघोजी शेवाळेची मुलगी)

राघोजी शेवाळेची मुलगी घरात आईला मदत करणारी, राघोजी व रामकोर चे भांडण सोडवणारी, दोघाची पण काळजी घेणारी आणि घरामध्ये राघोजीला आपली वाटणारी व्यक्ती ती म्हणजे त्याची मुलगी वर्षा. रामकोर रागात असली म्हणजे राघोजीला जेवन, चहा देत नाही पण त्याची मुलगी मात्र आपल्या आईची नजर चूकवून बापासाठी जेवन, चहा करून देते.

➢ रत्ना :–(बबन शेवाळेची प्रेयसी)

झाोपडपट्टीत राहणारी सुंदर, तरूण आणि चतुर मुलगी म्हणजे रत्ना. बबन तीच्या संदरतेवर मरतो. तीला तो फुकट पाणी, कमवलेली पैसे, नवनविन वस्तु आणि साड्याा देतो. अनेक खाण्या–पिण्याच्या वस्तू घेवून देतो आणि रत्नाला पण पैसे मिळतात त्यामुळे पण ती बबन शेवाळे ला विरोध करीत नाही. पण जेव्हा रत्नाच्या बापाला कळते त्यावेळी मात्र ती त्याची साथ देत नाही. रत्ना बबन प्रकरणाचे भांडवल करून त्याला मारतात, धमकवतात व लुबाडतात आणि विकृत तहान भागवतात या तुलनेने बबनची पैशाची आणि रत्नाची तहान स्वाभाविक वाटते.

❖ तहान मधोल धार्मिक व समाजजीवन :–

ग्रामीण समाज देवपूजा, देवदेवतांची आराधना, उपासना करून योग्य मार्गाचा अवलंब कसा करतात याचे वर्णन 'तहान' मधील अनेक घटना प्रसंगातून सदानंद देशमुख यांनी केले आहे.

'देव' ही संकल्पना नसती तर माणसाचे माणूसपण टिकले नसते हे वरील संवादातून दिसून येते.

'तहान' कादंबरीतील राघोजी शेवाळे आपल्या बायकोच्या बदललेल्या स्वभावाने भूतकाळातील आठवणींमध्ये रमतो. स्वतःचा एकटेपणा घालविण्यासाठी संतवचनाचा आधार देतो. आपल्या घरातील कौटुंबिक संघर्ष पाहता त्याला संत तुकारामाच्या अभंगाच्या ओळी आठवतात.

''जन हे सुखाचे, दिल्या घेतल्याचे,
अंत हे काळाचे, नाई कोणी, हीन झाल्या शक्ती,
नाक डोळे गळती, सोडूनिया जाती रांडपोरे''( तहान पृ 25)

नवऱ्यापेक्षा आपला मुलगाच आपल्याला सुखी ठेवीन या विचारान नवऱ्याचा त्रागा करणाऱ्या रामकोरच्या वागण्याने दुःख झालेला राघोजी धर्माचा आधार घेतो.

अशा प्रकारे धर्म ही संकल्पना संपूर्ण मानवी समाजाला व्यापून टाकणारी असून या संकल्पनेभोवती मानवी समुह जीवन केंद्रित होवून त्याबरोबर धार्मिक भाव—भावनांचा संबंध येतो. सदानंद देशमुख यांनो धार्मीक रूढी, परंपरा, अंधश्रध्दा या समाजाला कशा पोषक आणि विघातक आहे हे त्यानी अतिशय संवेदनशीलतेने व्यक्त केले आहे.

सदानंद देशमुख यांनी तहान कादंबरीमध्ये समाजजीवन रेखटताना पाणीटंचाईच्या भीषण प्रश्नांची दाहकता चित्रित केली आहे. पाणीटंचाई असलेल्या गावात या कादंबरीचा नायक बबन शेवाळे पाणीविक्रीचा व्यवसाय करतो. नौकरदार, हॉटेल मालक यांनी पाणी विकून पैसा मिळवणाऱ्या बबनची परिस्थिती या व्यवसायातून सुधारते. परंतु गारमाळच्या चढावरून बैलगाडी ओढून आणणाऱ्या बैलांची अवस्था पाहून राघोजी मात्र तळमळतो. पाणीविक्रीतून मिळणाऱ्या पैशापेक्षा मातीत घाम गाळून कष्टाने पैसे मिळावेत या विचाराच्या राघोजीकडे कुटुंबातील सर्वच सदस्य दुर्लक्ष करतात. पुढे गावात पाण्याचे टॅकर सुरू होताच बबनची आर्थिक परिस्थिती ढासळते. तेव्हा मात्र या कुटुंबात पैशाची चणचण भासते. असे वर्णन या कादंबरीत सदानंद देशमुख यांनी केले आहे. पाणी विक्रीतून मिळवलेला पैसा कसा खर्च करावा हे बबनला कळत नाही. त्यामुळे सिनेमा बघणे, धाब्यावर जेवणे, रत्नावर पैसे उधळणे अशा गोष्टी तो करतो चंगळवादी नवीन पिढीच्या हातात श्रमाशिवाय अधिक पैसा आल्यास त्याचा विनियोग योग्य मार्गाने न होता नैतिक व सामाजिक मूल्यांचा ऱ्हास होतो. हे आजच्या नवीन पिढीचे सामाजिक चित्र सदांनद देशमुख यांनी या कादंबरीत चित्रित केलेली आहे.

### ❖ जीवन मरणाला व्यापून उरणारी 'तहान':—

पर्यावरणाचा नाश आणि वारंवार पडणारा दुष्काळ यामुळे पाण्याची भेडसावणारी टंचाई हा आज भारताचा नव्हे तर जगाचा प्रश्न बनलेला आहे. अशी ही सर्वांच्या जीवावर उठलेली पाणी टंचाई सदानंद देशमुखांनी आपल्या 'तहान' कादंबरीतून मनःपूर्वक साकार केलेली आहे. पाण्यावरून होणारी भांडणे, पाण्यावरून होणाऱ्या चोऱ्या, पाण्यासाठी विहरीत पाय घसरूण मेलेली माणसे आणि पाण्यावाचून सामान्य माणसाची होणारी रोजची घालमाले, धावपळ लेखकाने उत्तम प्रकारे दाखविली आहे.

''मर्ढेकराच्या भाषेत लेखकाजवळ असणारी आत्मनिष्ठा ही महत्वाची असते. त्या जीवनाबद्दल
त्या विषयाबद्दल नि माणसाबद्दल लेखकाला तीव्रतेने जाणवायला हवे. तो विषय त्याच्या रक्तात भिनलेला असेल तर मग त्यातून कारागिरी वा कृत्रिमता निर्माण होत नाही.'' [(4)] सामान्य

माणसाच्या घामाचा वास आणि मातीचा गंध संपूर्ण चित्रण माणसाची जीवनशैली व लोकसंस्कृतीचे दर्शन आपणास घडविते.

हातात भांडी आणि बादल्या घेवून दिवसरात्र पाण्यासाठी वणवण भटकणारी माणसे, तळातल्या गाळमिश्रित पाण्यासाठी विहिरीवर गर्दी करणाऱ्या बायका,कोरड्याा पडलेल्या हापश्याशी आदळ–आपट करणारी पोरं, टॅंकरची वाट पाहणारी माणसे, पाण्यासाठी दूरदूर रानावनात हिंडणाऱ्या मुली, पाण्यावाचून तडफडणारे जनावरे, वाटेल ती किंमत देवून पाणी विकत घेणारे नौकरदारवर्ग व हॉटेलवाले या साऱ्यांचे चित्रण या कादंबरीमध्ये आलेले आहेत. त्यामुळे सारी माणसे पाण्यासाठीच जगतात आणि पाण्यावरच जगतात. पाण्याला पर्यायी साधने नाही. पाण्याची तहान पाणीच भागवू शकते व ते जिवनमूल्य आहे.

या कादंबरीमध्ये म्हाताऱ्या माणसांच्या जीवनाचे दर्शन आणि नव्या व जुन्या पिढीतील व्यक्तीच्या मानसिकतेत पडलेला फरक दाखविण्यात आलेला आहे. पाण्यावाचून राघोजीचे घामाणे चिकचिक झालेले अंग, हाताने शरीरावरच्या घामाच्या लोळया काढणारे शरीर. शिवाय राघोजीच्या डोळ्यासमोर रात्रभर शिवारात पडलेली हाडे व दारूच्या भट्टया, बबन रात्री सिनेमाला जाताना रात्रीच्या वेळी विहिरीवर टॅंकरणे टाकलेले पाणी भरणाऱ्या बायकांची गर्दी झालेला प्रसंग चित्रित करूण पाण्याच्या तिव्र प्रश्न लेखनाने यात मांडलेला आहे.

आजच्या समाजव्यवस्थेचा शेतकरी चराचराची तहान भागविण्यासाठी तळमळतो आहे. झाडं–झुडपं, गुरं– ढोरं, पशु–पक्षी आणि सर्जक मातीच्या तगमगीला घेवून तो तहानलेल्या स्वरामध्ये 'जीवन' मागतो आहे.

## ❖ निष्कर्ष

- 'तहान' कादंबरीच्या वाचनानंतर आपणाला तिची अनेक विध वैशिष्ट्यो जाणवायला लागतात तिची बलस्थाने जाणवायला लागतात आणि त्यातूनच मग ही कादंबरी आपल्या जिवनाला अधिक स्पर्शून जाते.
- सदानंद देशमुख यांच्या साहित्यातून साकारणारे समाजजीवन आजच्या काळातील सामाजिक जीवनाचे सुक्ष्म निरिक्षण करून विविध बारकावे प्रभावीपणे मांडलेले आहे. लेखकाने आपल्या साहित्यकृतीतून समाजजीवन, सामाजिक नैतिक मुल्ये, त्याच्या कलाकृतीतून शेतकऱ्याचे जीवन चित्रण, संघर्ष शोषित माणसाच्या भावनांची जाणीव, वेदना, व्यथा, मानवी समाज जीवनाचे जिवंत चित्रण यांचा साहित्य कृतीतुन व्यक्त झालेले आहेत.
- ग्रामीण जीवनातील जीवन जाणिवांच्या उभ्याआडव्या, नव्या जुन्या पीढीचा संघर्ष, कौटुंबीक पातळीवरील नात्यांमधला संघर्ष, शहर विरूध्द खेडे, किंवा श्रीमंत विरूध्द गरीब अश्या अनेक प्रकारचे संघर्ष आणि व्यक्तींच्या आंतरीक मनाच्या संघर्षाचे पीळदार विणोतून या कादंबरीचा अनेक पोत तेजस्वी झाला आहे.
- सदानंद देशमुख यांनी आपल्या साहित्यातून आर्थिक जिवनाचा वेध घेताना जागतिकीकरणानंतरच्या काळातील वास्तव चित्रण रेखाटले आहे. सामाजिक जिवनात होत जाणाऱ्या बदलाबरोबर आर्थिक जीवनात होणारे बदल यात रेखाटले आहेत.
- ग्रामव्यवस्थेतील बदललेल्या मूल्यव्यवस्थेला कसा तडा गेला याचे वास्तव दर्शन मांडले आहे. 'तहान' कादंबरीतून आर्थिक जिवन रेखाटताना समाजातील स्वार्थी, भ्रष्ट लोकांवर प्रकाश टाकताना तसेच भ्रष्टाचारामुळे सामान्य माणसांच्या आयुष्यावर होणारा परिणाम चित्रित करतात.

- तहान कादंबरीतून असे लक्षात येते की, शेतकऱ्यांची आजची परिस्थिती आहे त्यावर खिळखिळा कमजोर शासन, आणि जागतिकीकरण व पर्यावरण ह्याा सगळ्याा गोष्टीचा सखोल अभ्यास आणि शेतीविषयी अधिक माहिती मिळवणे हा आहे.

## संदर्भ ग्रंथ सुची

(1) डा. ईश्वर नंदपुरे :– 'साहित्य : ग्रामीण आणि दलित'
(डॉ. मदन कुलकर्णी गौरवग्रंथ)
सचिन ज. उपाध्याय, विजय प्रकाशन नागपूर
प्र. आ. 5 सप्टें.2002 (शिक्षक दिन) पृ.क 78

(2) प्रा. लक्ष्मीकांत येळवंडे :– 'सदानंद देशमुखांचा कादंबऱ्या एक आकलन',
स्मितांजली प्रकाशन, अहमदनगर.
प्र.आ.नोव्हें.2007, मनोगत.

(3) प्रा.विजय पाटीलः– बारोमास : एक अन्वयार्थ,
देवयानी कुलकर्णी, अभ्यंकर कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयनगर, पुणे–30.
प्र.आ.2011, पृष्ठ. क. 144

(4) डॉ. कैलास सार्वेकर :– तहानः स्वरूप आणि समीक्षा,
प्रशांत पब्लिकेशन, जळगाव;
प्र.आ.2015–2016, पृष्ठ. क 07